0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दि.०९/०६/२०११ रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४२/२०११/जा.४९९ दि. २३/०६/२०११, ०६/०७/२०११, २८/०७/२०११, १७/०८/२०११.

३) या कार्यालयाची "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४२/२०११/जा.७५८ दि.१९/०९/२०११.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भांडूप पोलिस ठाणे यांचे दि.१८/७/२०११, २५/०७/२०११, ०८/०८/२०११, २८/०८/२०११, ०२/०९/२०११ व १२/१०/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

५) राजकुमार उदयपाल सिंग, गोडावूनच्या जागेचे मालक यांचे दिनांक १४/०७/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले निवेदन.

६) टेम्पो क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व क्र. एमएच-०२-एक्सए-७२९७ चे मालक सौ. सुजाता उमेश पाटेकर यांचे दिनांक २९/०७/२०११ रोजीचे पोलिसांमार्फत प्राप्त झालेले निवेदन.

७) घनश्याम लालताप्रसाद सिंग याचे दि.३०/०८/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले निवेदन

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४२/२०११/जा. ८५४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.

दिनांक : २९/१०/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०६/०६/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी पंचासह सकाळी ठिक १०:१५ वाजता गांवदेवी चौक, गावदेवी रोड, भांडूप (प), मुंबई या ठिकाणी उपस्थित राहीले. तेथून जवळच असलेल्या राधा डाईंग मिलची जागा, गावदेवी रोड येथे आले. सदर राधा डाईंग मिलच्या मागील भागातील गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, गोडावूनमध्ये २ तीन चाकी टेम्पो रिक्षा व छोट्या पत्र्याच्या शेडमध्ये दोन इसम एका सिलेंडरवर दुसरा सिलेंडर उलटा करुन काहीतरी करीत असल्याचे दिसून आले. तसेच पत्र्याच्या शेडमध्ये घरगुती व व्यवसायीक वापराचे बरेचसे सिलेंडर साठवणूक केल्याचे आढळून आले.

सदर ठिकाणी उपस्थित इसमास त्याचे नाव गाव व सिलेंडरच्या साठ्याबाबत विचारणा केली असता, एकाने त्याचे नांव घनश्याम लालताप्रसाद सिंग असे सांगून तो मागील दोन महिन्यापासून राधा डाईंग मिलच्या मागील गोडावूनमध्ये शासन अनुदानित दराच्या गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये अनधिकृतपणे रिफीलींग करण्याचे काम पप्पू मिश्रा यांच्याबरोबर भागीदारीने करीत असल्याचे सांगीतले. तसेच पप्पू मिश्रा हे दोन दिवसापूर्वी सुलतानपूर (उत्तरप्रदेश) येथे गेले असल्याचेही सांगीतले. शासन अनुदानित दराचे गॅस सिलेंडर ते भांडूप व कांजूरमार्ग येथील डिलीव्हरी बॉय कडून प्रति सिलेंडर रुपये ४५०/- या दराने अनधिकृतपणे खरेदी करुन सदर घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये अनधिकृतरित्या रिफीलींग करुन बेकायदेशीररित्या व्यवसायीक सिलेंडरची गरजू व्यक्तिंना विक्री करण्यात येते. गॅस सिलेंडर खरेदी व विक्री करण्याचे काम पप्पू मिश्रा करतात. सिलेंडरची ने आण करण्याकरीता गोडावूनमध्ये आढळून आलेल्या तीन चाकी टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व एमएच-०२-एक्सए-७२९७ चा वापर केला जातो. तसेच अनधिकृतपणे गॅस रिफीलींग करण्यासाठी लोखंडी पाईपचा देखिल उपयोग केला जातो. सदर गॅस रिफीलींगचे अनधिकृत काम करण्यासाठी वापरण्यात येणारे गोडावून राजकुमार उदयपाल सिंग (जागेचे मालक) यांचेकडून प्रति महिना रुपये १३,०००/- मासिक भाड्याने घेतल्याचे सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

सदर ठिकाणी उपस्थित दुसऱ्या इसमास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नांव निरजसिंग कौसलसिंग असे सांगून घनश्याम लालताप्रसाद सिंग व पप्पू मिश्रा यांच्या सांगण्यावरुन नमूद ठिकाणी अनधिकृतपणे गॅस रिफीलींगच्या कामात मदतनिस म्हणून काम करीत असून, त्यासाठी त्यांना प्रतिदिन रुपये २००/- या प्रमाणे पगार दिला जात असल्याचे सांगीतले. तसेच घटनास्थळी आढळून आलेले टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व एमएच-०२-एक्सए-७२९७ देखील चालविण्याचे काम करतो. घरगुती व व्यावसायीक गॅस सिलेंडर खरेदी विक्रीचे काम पप्पू मिश्रा पहातात असेही सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबधितांनी संगनमत करुन शासनातर्फे अनुदानित दराने गॅस ग्राहकांना वितरीत होणारे तेल कंपनीचे घरगुती गॅस सिलेंडरची बेकायदेशिररित्या व अनधिकृतपणे खरेदी व साठवणूक करुन घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये रिफीलींग करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ तसेच एल.पी.जी. (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर २००० चे कलम ३ (१) (बी) (सी), ३ (२) ७ (बी) (सी) चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द भांडूप पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६५१/२०११, दि.०६/०६/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ.क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | बी.पी.सी.एल. कंपनीचे घरगुती वापरातील १४.२ कि.ग्रॅ. वजनाचे भरलेले गॅस सिलेंडर | १५ नग | २४,०००/- |
| २ | बी.पी.सी.एल. कंपनीचे घरगुती वापरातील १४.२ कि.ग्रॅ. वजनाचे रिकामे गॅस सिलेंडर | ९ नग | १०,८००/- |
| ३ | एच.पी.सी.एल. व बी.पी.सी.एल. कंपनीचे व्यावसायीक वापरातील रिकामे गॅस सिलेंडर | ३० नग | ३४,०००/- |
| ४ | एच.पी.सी.एल. कंपनीचे व्यावसायीक वापरातील अर्धवट भरलेले गॅस सिलेंडर | २ नग | २,९८०/-/- |
| ५ | तीन चाकी टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ | १ नग | ६०,०००/- |
| ६ | तीन चाकी टेम्पोरिक्षा I एमएच-०२-एक्सए-७२९७ | १ नग | ६०,०००/- |
| ७ | वजन काटा | १ नग | १,०००/- |
| ८ | रिफीलींगकरीता वापरण्यात येणारे लोखंडी पाईप | ६ नग | ६००/- |
| ९ | प्लास्टीक बुच | ७० नग | ७००/- |
| १० | लाल प्लास्टीक पेपर | ५० नग | ५०/- |
| | | एकूण | १,९४,१३०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी केलेली आहे. सबब, भांडूप पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६५१/२०११, दि.०६/०६/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्येमाल शासनजमा का करण्यात येऊ नये, याबाबत वाचावे क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून या कार्यालयात दिनांक ०२/०७/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. दरम्यान तपासी पोलिस अधिकारी यांनी टपालामार्फत सादर केलेल्या दि.०१/०७/२०११ रोजीच्या पत्रामध्ये सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून विनंती केली आहे. सबब, पोलिसांनी केलेल्या विनंतीनुसार सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता एक संधी म्हणून सदरची सुनावणी स्थगित करुन पुढील सुनावणी दि. १८/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली. दि. १८/०७/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली व पुढील सुनावणी दि. २५/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २५/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस गोडावूनचे मालक राजकुमार उदयपाल सिंग यांच्या वतीने श्री. किर्ती. के. खोना हे प्राधिकारपत्रासह उपस्थित राहिले. दरम्यान त्यांनी राजकुमार उदयपाल सिंग याचे निवेदन यापूर्वीच टपालामार्फत सादर केल्याचे सांगितले. सदर सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी यांनीही त्यांचे

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FFICE

अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस घनश्याम लालताप्रसाद सिंग हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून लेखी विनंती केली. इतर आरोपी/अपचारी सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने पुढील सुनावणी दिनांक ०९/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाही. तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांनी त्यांचे अभिवेदन वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत या कार्यालयास सादर केले. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी अंतीम संधी द्यावी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २३/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २३/०८/२०११ रोजीच्या सुनावणीसही आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. गोडावूनचे मालक राजकुमार उदयपाल सिंग यांनी त्यांचे निवेदन वाचावे क्र. ५ अन्वये टपालामार्फत या कार्यालयास सादर केले. तथापी, इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत अथवा त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले नाहीत.

पोलिसांनी सादर केलेल्या अभिवेदनात, गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल हा आरोपी यांना परत करण्यास पोलिसांची सक्त हरकत असल्याचे नमूद करुन तो ज्वलनशील असल्याने कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे त्वरीत आदेश होणेस पोलीसांनी विनंती केली आहे. प्रस्तूत प्रकरणी जप्त केलेले गॅस सिलेंडर भरलेले असून, ते ज्वलनशिल असल्याने त्याची त्वरीत विल्हेवाट लावणे अगत्याचे आहे. तसेच सबब, गॅस सिलेंडरच्या विल्हेवाटीबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ३ अन्वये अंतरीम आदेश पारीत करण्यात आले.

तद्नंतरही इतर आरोपी/अपचारी यांनी त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद :-</u>**

पोलिस उपनिरिक्षक, भांडूप पोलिस ठाणे यांनी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यात जप्त केलेले २ टेम्पो, सिलेंडर व इतर वस्तू टेम्पो मालकास, सिलेंडर मालकास देण्यास पोलिसांची सक्त हरकत असल्याचे नमुद करुन जप्त टेम्पो ठेवण्यास पोलीस स्टेशनचे आवारात जागा अपूरी असल्याने टेम्पोच्या विल्हेवाटीबाबत लवकर आदेश होणेस विनंती केली आहे.

राजकुमार उदयपाल सिंग यांनी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, राधा डाईंग मिलच्या मागे, गांवदेवी चौक, गांवदेवी रोड, भांडूप (पश्चिम), मुंबई - ४०० ०७८ येथील गोडावून त्याच्या मालकी हक्काचे असून सदरहू गोडावून पप्पू मिश्रा यांना भाडे तत्त्वावर देण्यात आले होते. सदर गोडावूनचे दरमहा भाडे रुपये १३,०००/-

CONTROLLER OF RATIONING HEAD

ठरलेले हाते. सदर गोडावून हे ऑटो गॅरेज चालविण्यासाठी दिलेले असून सदरहू गोडावूनमध्ये जवळजवळ २५० ते ३०० गाडया उभ्या असतात. गॅरजेचे काम, पेन्टींगचे काम, डायमेकरचे काम आणि वेल्डिंगचे काम चालू असते. पप्पू मिश्रा यांनी त्याच्याकडे त्याच्या मित्राला घेवून सिलेंडर ठेवण्याकरिता जागा पाहिजे असे सांगितले. त्याने सिलेंडर ठेवण्याकरिता परवानगी दिली. सदर ठिकाणी शिधावाटप अधिकारी आले आणि त्यावेळी त्याला त्यांनी सिलेंडर कोठे ठेवतात असे विचारणा केली असता, त्याने सिलेंडर ठेवतात त्या ठिकाणी त्यांना नेवून दाखविले. परंतू त्याला अनधिकृतपणे सिलेंडर रिफीलींग करण्याचे काम त्याच्या गोडावूनमध्ये होत आहे, याबाबत काहीही कल्पनादेखील नव्हती. तसेच तो लेक रोड येथे राहत असून वारंवार बाहेरचे काम करण्यास तारापूर येथे येण-जाणे चालूच असते. त्यामुळे तो सदर गोडावूनमध्ये नियमित जात नसे. बेकायदेशिररित्या व अनधिकृतपणे खरेदी व साठवणूक करुन घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यावसायीक गॅस सिलेंडर रिफीलींग करुन ग्राहकांची घोर फसवणूक केलेली आहे. त्यामुळे पप्पू मिश्रा हा त्याचा भाडोत्री जरी असला तरी त्याच्यावर कारवाई करावी. सदर प्रकरणात त्याचा कोणताही हात नसून पप्पू मिश्रा याच्यावर योग्य ती कारवाई करावी, असे नमूद केले आहे.

टेम्पो क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व क्र.एमएच-०२-एक्सए-७२९७ चे मालक सौ. सुजाता उमेश पाटेकर यांनी दिनांक २९/०७/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, सदर दोन्ही टेम्पोने ते दहिसर रावळपाडा या विभागात अंगणवाडीला शासनामार्फत मिळणारे शिरा, उपमा, उसळ, चणे असे खाद्यपदार्थ शाळेला पोहचविण्याचे काम करीत होते. सन २००९ रोजी अंगणवाडीला मिळणारे खाद्यपदार्थ मिळण्याचे काम बंद झाल्याने सदरचे टेम्पो वर्षभर जागेवर उभे होते. त्यामुळे ते गंजू व सडू लागले म्हणून हे दोन्ही टेम्पो भंगारात उपाध्याय यास विकले व त्याने घनश्याम लताप्रसाद सिंग यास विकले. ही माहिती त्यांना नोटीस मिळाल्यानंतर समजली. या दोन्ही टेम्पोशी त्यांचा काहीही संबंध नसून टेम्पोचे मालक सध्या ते नाहीत. त्यामुळे ज्याचे टेम्पो आहेत त्यांचेकडेच विचारणा करावी, असे नमुद केले आहे. तसेच सौ सुजाता उमेश पाटेकर यांनी पोलीसांना दिलेल्या लेखी जबाबात, सन २००९ पासून सदरचे दोन्ही टेम्पो त्यांनी कोणाचाही नावांवर केले नाही व आर.सी. बूक तसेच अन्य कागदपत्रे कोणासही दिले नाही. टेम्पो नावावर करण्यासाठी आरटीओ अधिकारी यांचेकडे कागदपत्रे सादर केले नसल्यामुळे आजपर्यंत दोन्ही टेम्पो त्यांचेच नावावर आहेत. सदरच्या टेम्पोशी त्यांचा काहीही संबंध नाही व गुन्ह्यात जप्त केलेल्या टेम्पोचे मालक ते नसून घनश्यामदास लालताप्रसाद सिंग याने सदर दोन्ही टेम्पो विकत घेतले असल्याने दोन्ही टेम्पोबाबत त्यास विचारणा करावी, असे नमुद केले आहे.

घनश्याम लालताप्रसाद सिंग यांनी दि.३०/०८/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, अधिकाऱ्यांनी जप्त केलेले टेम्पो क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व क्र.एमएच-०२-एक्सए-७२९७ हा त्याच्या मालकीचा आहे. हे दोन्ही टेम्पो त्याने श्रीमती सुजाता उमेश पाटेकर यांचेकडून खरेदी केले आहेत. खरेदी-विक्री

करारनामा सोबत सादर केला आहे. दोन्ही टेम्पोची आरटीओ मध्ये नोंदणी अजुनही त्याच्या नावावर झालेली नाही. तो दोन्ही टेम्पोने माल वाहतूकीचा व्यवसाय करतो. ज्या मालाचे भाडे मिळेल त्या मालाची वाहतुक करीत असतो. दिनांक ०६/०६/२०११ रोजी मालाची वाहतुक करुन दोन्ही टेम्पो राधा डाईंग मिलच्या जागेत पार्कींग केले व टेम्पोचे ड्रायव्हर तेथून निघून गेले. तो थोड्यावेळाने टेम्पोजवळ येवून उभा राहीला व तेथेच असलेल्या गोडावूनमध्ये त्याच्या ओळखीचे इसमास भेटण्याकरीता गेला. परंतु अधिकाऱ्यांनी या गोडावूनवर धाड टाकली व त्याला पकडून त्याचेकडेच विचारणा केली. त्याने अधिकाऱ्यांना वारंवार सांगीतले की, या गोडावूनशी त्याचा काहीही संबंध नाही व हे दोन्ही टेम्पो त्याने पार्कींग करीता उभे केले होते. परंतु अधिकाऱ्यानी त्याचे काहीही ऐकले नाही. त्यानंतर त्याला पोलीस स्टेशनमध्ये घेवून गेले व काहीतरी लिहीलेल्या कागदावर त्याची सही घेतली. गोडावूनमध्ये काय धंदा चालतो व सिलेंडर कोठून आणतात याबाबत त्याला काहीही माहित नाही व या गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नाही. तो या दोन्ही टेम्पोने गोडावूनमधील सिलेंडरची वाहतुक करीत नाही. हे दोन्ही टेम्पो त्याने पार्कींगकरीता त्या ठिकाणी उभे केले होते. या टेम्पोच्या व्यवसायावरच त्याच्या परिवाराचे जीवनमान अवलंबून आहे. टेम्पो जप्त केल्याने व्यवसाय बंद असून, त्याचा आर्थिक ताण कुटूंबावर होत आहे. तरी त्याचा या गुन्ह्याशी काहीही संबंध नसल्याने जप्त केलेले दोन्ही टेम्पो क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व .एमएच-०२-एक्सए-७२९७ त्याला परत करण्यात यावे, असे नमुद केले आहे.

इतर आरोपी/अपचारी पप्पू मिश्रा व निरजसिंग कौसलसिंग सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०६/०६/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह गांवदेवी चौक, गावदेवी रोड, भांडूप (प), मुंबई येथून जवळच असलेल्या राधा डाईंग मिलच्या मागील भागातील गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, गोडावूनमध्ये २ तीन चाकी टेम्पो रिक्षा व छोट्या पत्र्याच्या शेडमध्ये दोन इसम एका सिलेंडरवर दुसरा सिलेंडर उलटा करुन काहीतरी करीत असल्याचे दिसून आले. तसेच पत्र्याच्या शेडमध्ये घरगुती व व्यवसायीक वापराचे बरेचसे सिलेंडर साठवणूक केल्याचे आढळून आले. सदर ठिकाणी उपस्थित इसम घनश्याम लालताप्रसाद सिंग याचेकडे सदर सिलेंडरच्या साठ्याबाबत विचारणा केली असता, तो मागील दोन महिन्यापासून राधा डाईंग मिलच्या मागील गोडावूनमध्ये शासन अनुदानित

CONTROLLER OF RATIONING HEAD ... MUM

0007
दराच्या गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये अनधिकृतपणे रिफीलींग करण्याचे काम पप्पू मिश्रा यांच्याबरोबर भागीदारीने करीत असल्याचे सांगीतले. तसेच पप्पू मिश्रा हे दोन दिवसापूर्वी सुलतानपूर (उत्तरप्रदेश) येथे गेले असल्याचेही सांगीतले. शासन अनुदानित दराचे गॅस सिलेंडर ते भांडूप व कांजूरमार्ग येथील डिलीव्हरी बॉय कडून प्रति सिलेंडर रुपये ४५०/- या दराने अनधिकृतपणे खरेदी करुन सदर घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये अनधिकृतरित्या रिफीलींग करुन बेकायदेशीररित्या व्यवसायीक सिलेंडरची गरजू व्यक्तिंना विक्री करण्यात येते. गॅस सिलेंडर खरेदी व विक्री करण्याचे काम पप्पू मिश्रा करतात. सिलेंडरची ने आण करण्याकरीता गोडावूनमध्ये आढळून आलेल्या तीन चाकी टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व एमएच-०२-एक्सए-७२९७ चा वापर केला जातो. तसेच अनधिकृतपणे गॅस रिफीलींग करण्यासाठी लोखंडी पाईपचा देखिल उपयोग केला जातो. सदर गॅस रिफीलींगचे अनधिकृत काम करण्यासाठी वापरण्यात येणारे गोडावून राजकुमार उदयपाल सिंग (जागेचे मालक) यांचेकडून प्रति महिना रुपये १३,०००/- मासिक भाड्याने घेतल्याचे सांगीतले. तसेच दुसरा इसम निरजसिंग कौसलसिंग याचेकडे विचारणा केली असता, तो घनश्याम लालताप्रसाद सिंग व पप्पू मिश्रा यांच्या सांगण्यावरुन नमूद ठिकाणी अनधिकृतपणे गॅस रिफीलींगच्या कामात मदतनिस म्हणून काम करीत असून, त्यासाठी त्यांना प्रतिदिन रुपये २००/- या प्रमाणे पगार दिला जात असल्याचे सांगीतले. तसेच घटनास्थळी आढळून आलेले टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व एमएच-०२-एक्सए-७२९७ देखील चालविण्याचे काम करतो. घरगुती व व्यावसायीक गॅस सिलेंडर खरेदी विक्रीचे काम पप्पू मिश्रा पहातात असे सांगीतले. यावरुन सदर दोन्ही टेम्पो व ५६ रिकामे/भरलेले गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले.

आरोपी पप्पू मिश्रा व निरजसिंग कौसलसिंग यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेसी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

आरोपी घनश्याम लालताप्रसाद सिंग यांनी केलेल्या खुलाशात, तो दोन्ही टेम्पोने माल वाहतूकीचा व्यवसाय करत असून, ज्या मालाचे भाडे मिळेल त्या मालाची वाहतुक करीत असतो. दिनांक ०६/०६/२०११ रोजी मालाची वाहतुक करुन दोन्ही टेम्पो राधा डाईंग मिलच्या जागेत पार्कींग केले व टेम्पोचे ड्रायव्हर तेथून निघून गेले. तो थोड्यावेळाने टेम्पोजवळ येवून उभा राहीला व तेथेच असलेल्या गोडावूनमध्ये त्याच्या ओळखीचे इसमास भेटण्याकरीता गेला असता, अधिकाऱ्यांनी या गोडावूनवर धाड टाकली व त्याला पकडून त्याचेकडे विचाराणा केली. गोडावूनमध्ये काय धंदा चालतो व सिलेंडर कोठून आणतात याबाबत त्याला काहीही माहित नाही. या गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नसून तो या टेम्पोने गोडावूनमधील सिलेंडरची वाहतुक करीत नसल्याचे नमुद केले आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

तथापी, घनश्याम लालताप्रसाद सिंग यांनी घटनास्थळी अधिकाऱ्यांना दिलेल्या जबाबात, शासन अनुदानित दराच्या गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये अनधिकृतपणे रिफीलींग करण्याचे काम सदर राधा डाईंग मिलच्या मागील गोडावूनमध्ये पप्पू मिश्रा यांच्याबरोबर भागीदारीने करीत असून, शासन अनुदानित दराचे गॅस सिलेंडर ते भांडूप व कांजूरमार्ग येथील डिलीव्हरी बॉय कडून प्रति सिलेंडर रुपये ४५०/- या दराने अनधिकृतपणे खरेदी करुन सदर घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये अनधिकृतरित्या रिफीलींग करुन बेकायदेशीररित्या व्यवसायीक सिलेंडरची गरजू व्यक्तिंना विक्री करण्यात येते. गॅस सिलेंडर खरेदी व विक्री करण्याचे काम पप्पू मिश्रा करतात. तसेच सिलेंडरची ने आण करण्याकरीता गोडावूनमध्ये आढळून आलेल्या तीन चाकी टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व एमएच-०२-एक्सए-७२९७ चा वापर केला जातो, असा जबाब दिला आहे. त्याचप्रमाणे आरोपी निरजसिंग कोसलसिंग यांनीही घटनास्थळी अशाप्रकारे जबाब दिलेला असून, अनधिकृपणे गॅस रिफिलींग करत असल्याची बाब त्यांनी घटनास्थळी मान्य केली आहे. यावरुन आरोपी यांनी शासनातर्फे अनुदानित दराने गॅस ग्राहकांना वितरीत होणारे तेल कंपनीचे घरगुती गॅस सिलेंडरची बेकायदेशिररित्या व अनधिकृतपणे खरेदी व साठवणूक करुन सदर घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये रिफीलींग करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून, याबाबत मा.न्यायालयात योग्य ती सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, प्रस्तुत प्रकरणी दिनांक १९/०९/२०११ रोजी पारित करण्यात आलेले अंतरीम आदेश कायम करण्याच्या निष्कर्शाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेले टेम्पो क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व .एमएच-०२-एक्सए-७२९७ हे सौ. सुजाता उमेश पाटेकर यांचेकडून खरेदी केलेले असून, ते घनश्याम लालताप्रसाद सिंग यांच्या मालकीचे असल्याचे त्यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. तथापी, सौ सुजाता उमेश पाटेकर यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचे दोन्ही टेम्पो वर्षभर उभे असल्याने ते गंजू लागले. त्यामुळे दोन्ही टेम्पो त्यांनी भंगारात उपाध्याय यास विकले व उपाध्याय यांनी ते टेम्पो घनश्याम लालताप्रसाद सिंग यांना विकले असल्याचे नमुद करुन त्यांचा या टेम्पोशी कोणताही संबंध नसल्याचे नमुद केले आहे. घनश्याम लालताप्रसाद सिंग यांनी केलेल्या खुलाशात, हे दोन्ही टेम्पो त्यांनी घटनास्थळी पार्कींग केले असून, या टेम्पोने ते जप्त गॅस सिलेंडरची वाहतूक करीत नसल्याचे नमुद केले आहे. तथापी, घटनास्थळी दिलेल्या जबाबात, अनधिकृतपणे रिफीलींग केलेल्या गॅस सिलेंडरची ने आण करण्याकरीता सदरचे दोन्ही टेम्पोचा वापर केला जातो, असा जबाब दिला आहे. यावरुन आरोपी घनश्याम लालताप्रसाद सिंग याने जाणीवपूर्वक बेकायदेशिररित्या रिफिलिंग केलेल्या गॅस सिलेंडरची वाहतूक करण्यासाठी सदर दोन्ही टेम्पोचा गैरवापर केला असल्याचे स्पष्ट होते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेले टेम्पो क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व क्र.एमएच-०२-



CONTROLLER OF RATIONING & ... HEAD O... UMB...

एक्सए-७२९७ हे त्याच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे टेम्पो त्यांच्या मालकांस परत करण्याच्या अथवा टेम्पोचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, टेम्पोच्या मालकीबाबत कोणताही कायदेशी पुरावा सादर न केल्याने अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरते सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्राप्त झालेल्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये भांडूप पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. गुन्हा नोंद क्र. ६५१/२०११, दि.०६/०६/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) या कार्यालयाचे दिनांक १९/०९/२०११ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेले टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ व तीन चाकी टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२९७ हे शासनजमा करण्यात येत आहेत. सदर प्रत्येकी टेम्पोरिक्षाच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टेम्पोरिक्षाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे टेम्पोरिक्षा त्यांच्या मालकांस परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी दोन्ही टेम्पोरिक्षाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा टेम्पोरिक्षाचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोरिक्षाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे टेम्पोरिक्षा लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले १ नग वजन काटा, ६ नग रिफीलींगकरीता वापरण्यात येणारे लोखंडी पाईप, ७० नग प्लास्टीक बुच, ५० नग लाल प्लास्टीक पेपर इत्यादी वस्तू शासनजमा करण्यात येत असून सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलिसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ हया लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) घनश्याम लालताप्रसाद सिंग
२) पप्पू मिश्रा
३) तीन चाकी टेम्पोरिक्षा क्र.एमएच-०२-एक्सए-७२८२ चे मालक
४) तीन चाकी टेम्पोरिक्षा क्र. एमएच-०२-एक्सए-७२९७ चे मालक
५) राजकुमार उदयपाल सिंग, गोडावूनच्या जागेचे मालक
६) निरजसिंग कौसलसिंग
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भांडूप पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भांडूप पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) विभागीय व्यवस्थापक, मे. हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) विभागीय व्यवस्थापक, मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.